# राज्य खनिज धोरण १९९९ (महाराष्ट्र शासन)

महाराष्ट्र राज्य हे दगडी कोळसा, चुनखडक, लोहखनिज, मॅंगनीज, कायनाईट, सिलिमनाईट, बॉक्साईट इत्यादि खनिज संपत्तीने समृद्ध असून खनिज उत्पादनाच्या बाबतीत राष्ट्रीय स्तरावर राज्याचा सहावा क्रमांक लागतो. केंद्र शासनाने वर्ष १९९३ मध्ये राष्ट्रीय खनिज धोरण घोषित केले त्या अनुषंगाने खाली दिल्याप्रमाणे शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.——

(अ) पूर्वी उत्खननाकरीता फक्त सार्वजनिक क्षेत्राकरिताच आरक्षित करण्यात आलेली अशी १३ खनिजे जसे, लोहखनिज, मॅंगनीज, क्रोम, गंधक, सोने, हिरे, तांबे, शिसे, जस्त, मालीब्डेनम, टंगस्टन, निकेल आणि प्लॅटीनम खनिज समूह ह्यांना खनिज सूचीतून वगळण्यात आलेले आहे. ही खनिजे उत्खननासाठी आता खाजगी क्षेत्राकरीता खुली करण्यात आलेली आहेत ;

(ब) परदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान याला प्राधान्य देण्यात येईल. खाणकाम क्षेत्रात परदेशी गुंतवणूकीची मर्यादा वाढवून ती ५० टक्केपर्यंत करण्यात आलेली असून ही मूभा भारतीय कंपन्यांना खाणकाम क्षेत्राकरीता देण्यात आलेली आहे ;

(क) खनिज आणि धातू प्रक्रिया करणारे कारखाने जे (बंदिस्त) खाणी विकसीत करण्याकरिता तयार असतील अशांना कच्चा माल अनुक्रमाने पुरविण्यास आश्वासीत करण्यात येईल आणि अशा प्रक्रिया घटकांसाठी यापूर्वी मर्यादित परवानगी देण्यात आलेली आहे. अशा उद्योजकांना परदेशी गुंतवणूक करुन घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल. प्रकरणनिहाय अबंदिस्त खाण उद्योगांकरता देखील परदेशी गुंतवणूकीची मर्यादा ५० टक्क्यावर वाढवून देण्याचा विचार करणे शक्य आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खनिज धोरणाच्या अनुषंगानेच महाराष्ट्र शासनाने आपल्या राज्याकरिता खनिज धोरण निर्धारित केलेले आहे.

## राज्य खनिज धोरणाची वैशिष्ट्ये

खाणकाम क्षेत्रात आणि खनिजांवर आधारित उद्योगधंद्याची पद्धतशीर आर्थिकदृष्ट्या वाढ होण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील खनिज साठ्यांचा विवेकशील उपयोग करण्यात येईल. राज्याच्या खनिज धोरणांची मूळ वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.——

(१) आधुनिक पूर्वेक्षण तंत्रज्ञानाद्वारे राज्यातील खनिज साठ्यांचा शीघ्रतेने शोध घेणे ;

(२) खनिजाचे संधारण मजूरांची व खाणीची सुरक्षितता आणि पर्यावरणाचा समतोल या गोष्टी विचारात घेऊन जास्तीत जास्त खाण उद्योगात खाजगी क्षेत्रांनी सहभागी होण्याबाबत चालना देणे ;

(३) खनिज क्षेत्रात पायाभूत सुविधा विकसीत करणे ;

(४) खाणकाम नियमातील तरतुदींचे सुलभीकरण करणे आणि यासंबंधी त्वरीत निर्णय घेवून ही प्रक्रिया इष्टतम पारदर्शक बनविणे ;

(५) ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल त्या त्या ठिकाणी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरीता नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे.

## पूर्वेक्षण

### आधुनिक तंत्रज्ञान

महाराष्ट्र शासन, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयामार्फत दरवर्षी केंद्र शासनाचे संबंधीत खात्यासोबत विचारविनिमय करुन तसेच सुत्रबद्ध खनिज समन्वेषण कार्यक्रम नियोजित करुन महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या महत्वाच्या खनिजांचे जसे–कोळसा, चुनखडक, लोहखनिज, बॉक्साईट आणि क्रोमाईट इत्यादी शोधकार्य करीत असते. केंद्र शासनाचे उद्देशपूर्ण निर्धारित केलेल्या धोरणानुसार आणि बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार राज्यस्तरीय परदेशी गुंतवणूकीस चालना देऊन प्रत्येक राज्याने विशेषतः ज्या क्षेत्रात तुलनात्मकरित्या जास्त फलदायी ठरू शकेल त्या क्षेत्रात उचित परदेशी गुंतवणूकीचे स्वागत करावे. महाराष्ट्र राज्य देखील त्या बाबतीत मागे नसून ज्या परदेशी कंपन्या राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे खनिजांचे पूर्वेक्षण करण्याचेबाबत प्रतिसाद देतील अशा कंपन्यांना मदत करण्याचे धोरण अवलंबिण्यात येईल.

### भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचे पुनर्गठन

महाराष्ट्र राज्यात सुरू असलेल्या खनिजांच्या पूर्वेक्षणाचा दर्जा शिघ्रगतीने सुधारून केंद्र शासनाचे बरोबरीने आणण्याकरीता महाराष्ट्र शासनाने प्राधान्याने भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाद्वारे पुनर्गठन करण्याचे ठरविले आहे. याकरिता राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या नागपूर, चंद्रपूर, औरंगाबाद, जळगाव, रत्नागिरी व कोल्हापूर या सहा केंद्रापैकी फक्त नागपूर व कोल्हापूर ह्या दोन ठिकाणी केंद्रीकरण करण्याचे ठरले. त्यामुळे आस्थापनेवरील खर्चात नुसती कपात होण्यास मदत होईल. एवढेच नव्हेतर त्यामुळे काही कर्मचारी व काही वाहने वेगवेगळ्या जिल्ह्यासाठी खनिज प्रशासनाचे कामात वळते करण्यास मदत होईल. जर वाहनांची सोय प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध करुन देण्यात आली तर वार्षिक खनिज महसुलात कमीत कमी १० टक्के प्रमाणात निश्चितच वाढ होईल. खनिज प्रशासनाचे कार्यात सुधारणा करण्याचे दृष्टीने प्रत्येक विभागीय आयुक्त कार्यालयात उपसंचालक, या वरिष्ठ दर्जाचा अधिकारी पदस्थापित करण्यात येईल, परंतु ह्यावर अतिरिक्त खर्च होऊ देणार नाही. ही व्यवस्था कनिष्ठ स्तरीय रिक्त पदांचे प्रत्यार्पण करुन त्या जागी आवश्यक तेवढ्या उपसंचालक पदांची निर्मिती करता येईल. कर्मचाऱ्यांमुळे येणारा अतिरिक्त खर्चाचा बोझा किंवा कुठलाही आधार न घेता ह्याबाबत अपेक्षित कार्यवाही विशेष प्रस्थापित उपसमितीद्वारे करण्यात येत आहे.

भूगर्भातील खनिजे ही नैसर्गिक मुल्यवान संपत्ती असून कोळसा, चुनखडक, लोह खनिज, मॅगनीज, कायनाईट, सिलीमनाईट, बॉक्साईट इत्यादी खनिज संपत्तीचे महाराष्ट्र राज्यामध्ये विपुल साठे उपलब्ध असल्याचे निदर्शनास येत आहेत. खनिज उत्पादनाबाबत देशामध्ये महाराष्ट्र राज्याचा ६ वा क्रमांक लागतो. राज्यात एकूण कोळसा ४९९० दशलक्ष टन, चुनखडक १३७० दशलक्ष टन, लोह खनिज २५९ दशलक्ष टन, मॅंगनीज २१ दशलक्ष टन, बॉक्साईट ११२ दशलक्ष टन इत्यादी खनिजांचे साठे आहेत.

खनिज कायद्याप्रमाणे खनिजांचे वर्गीकरण दोन प्रकारे करण्यात येते.

(१) **प्रमुख खनिज.**–कोळसा, चुनखडक, लोह खनिज, मँगनीज इत्यादी ;

(२) **गौण खनिज.**–दगड, रेती, माती इत्यादी.

**प्रमुख खनिज.**––प्रमुख खनिजाकरिता सवलती, केंद्र शासनाने तयार केलेल्या खाणी व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ व खनिज सवलत नियम, १९६० अंतर्गत शासनाच्या व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्तरावरुन मंजूर करण्यात येतात.

**गौण खनिज.**––गौण खनिजाकरिता सवलती, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम (विदर्भ विभाग) १९६६, दि रुल्स रेग्युलेटींग दि वर्किंग ऑफ मायनर मिनरल्स, १९५४ आणि मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ या तीन नियमान्वये संबंधीत जिल्हाधिकारी स्तरांवर मंजूर करण्यात येतात.

(१) खाणी आणि खनिजे (विनियम व विकसन) अधिनियम, १९५७ मधील कलम ३ (ई) मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे बांधकामाचा दगड, ग्रेवल, साधी माती (विटाकरिता उपयोगी), रेती, चुनखडक (चुना बनविण्याच्या उपयोगाकरिता) दगड, कंकर, बेंटोनाईट, पाटीचा दगड, घरगुती कामासाठी वापरण्यात येणारा दगड व शोभीवंत दगड इत्यादी खनिजांचा समावेश गौण खनिजात होतो.

(२) महाराष्ट्र राज्यामध्ये गौण व प्रमुख खनिजांचे कामकाज सन १९६९ पर्यंत मंत्रालयातील उद्योग व कामगार विभागाकडे होते.

(३) सन १९६९ नंतर गौण खनिजांसंबंधीचे कामकाज मंत्रालयातील महसूल व वन विभागाकडे वर्ग करण्यात आले.

(४) महाराष्ट्रामध्ये गौण खनिजाकरिता खालीलप्रमाणे तीन प्रकारचे नियम प्रचलित आहेत.–

(१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम (विदर्भ विभाग), १९६६ (विदर्भाकरिता लागू).

(२) मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ (पश्चिम महाराष्ट्रासाठी लागू).

(३) गौण खनिजांच्या कार्याचे नियमन करण्याबाबत नियम, १९५४ (मराठवाडा विभागाकरिता लागू).

गौण खनिजाअंतर्गत सवलती मंजूर करण्यास संबंधीत जिल्हाधिकारी हे सक्षम अधिकारी आहेत.

(५) सध्या महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ विभागात तीन वेगवेगळे गौण खनिज उत्खनन नियम अंमलात आहेत. परंतु ह्या नियमांमध्ये समानता नसल्याने त्यांचे एकत्रिकरण करुन संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी एकच सुधारित नियम अंमलात आणणे आवश्यक आहे जेणेकरून, गौण खनिज उत्खनन नियमात सुसुत्रता येईल.

(६) केंद्र शासनाच्या ग्रेनाईट विकास परिषदेने प्रसारित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार **महाराष्ट्र ग्रेनाईट उत्खनन नियम, १९९५** मध्ये आवश्यक फेरबदल करण्याची आवश्यकता आहे.

सद्यःस्थितीत राज्यात प्रमुख खनिजाकरिता २४३ खाणी व गौण खनिजाकरिता १७८४ खाणी अस्तित्वात आहेत.

३. खनिज धोरणासंबंधीची खालीलप्रमाणे पाच ठळक वैशिष्ट्ये आहेत.——

(अ) समन्वेषण (एक्सप्लोरेशन) ;

(ब) खाजगी क्षेत्राचा सहभाग (प्रायव्हेट सेक्टर पार्टीसिपेशन) ;

(क) खाण क्षेत्रांचा विकास (डेव्हलपमेंट ऑफ मायनिंग एरियाज) ;

(ड) कार्यवाहीचे सुलभीकरण (सिम्प्लीफिकेशन ऑफ प्रोसिजर्स) ;

(इ) रोजगारांची उपलब्धता (एम्प्लॉयमेंट अपॉरच्युनीटीज.).

उपरोक्त वैशिष्ट्यांमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.——

(अ) (१) **आधुनिक तंत्रज्ञान (मॉडर्न टेक्नीक्स)**.——देशातील प्रत्येक राज्य आपआपल्या राज्यांमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करावी म्हणून नेहमीच परदेशी व्यक्ती/संस्था/कंपन्या यांचे स्वागत करीत असते. महाराष्ट्र राज्य देखील याबाबतीत मागे पडू नये म्हणून प्रस्तावित खनिज धोरण १९९९ अंगिकारून परदेशी व्यक्तींना/कंपन्यांना राज्यातील खनिज सर्वेक्षणामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात सामील करून घेण्याबाबत उत्सुक आहे.

(२) **खनिज भवनाचे बांधकाम (कन्स्ट्रक्शन ऑफ खनिज भवन)**.——भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या कार्यालयीन उपयोगासाठी नागपूर येथे संपूर्ण खाजगीकरणातून खनिज भवन या वास्तूचे बांधकाम करावयाचे प्रस्तावित आहे. खाजगी उद्योजकांना वाजवी दरामध्ये खनिजांचे रासायनिक पृथःकरण, पेट्रोलॉजीकल स्टडीज याबाबतची माहिती देणाऱ्या अत्याधुनिक अशा प्रयोगशाळांची सुविधा या इमारतीमध्ये असेल. खनिज भवनाचे बांधकाम संपूर्णतः खाजगीकरणातून होणार असल्यामुळे शासनावर कोणत्याही प्रकारचा जादा आर्थिक बोजा येणार नाही.

(ब) (१) **कवच यंत्रणेची निर्मिती (क्रिएशन ऑफ शेल एजन्सी)**.——खनिकर्म धोरणासंबंधीचे मुक्त धोरण निमशासकीय संस्थेमार्फत राबविण्याकरिता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाची कवच यंत्रणा म्हणून नियुक्ती करावयाचे प्रस्तावित आहे. या यंत्रणेमार्फत मुख्यत्त्वे खालीलप्रमाणे कामे केली जातील——

(अ) ज्या उद्योजकांना महाराष्ट्र शासनाकडून खनिपट्टा मंजूरीबाबतचे हेतुपत्र प्राप्त झाले आहे, तथापि खनिपट्ट्यासंबंधीची खाणकाम कार्यक्रम योजना स्वतः उद्योजकांना तयार करणे अशक्य असल्यामुळे खाजगी सल्लागारांकडून अशी योजना तयार करून घ्यावी लागते व त्यासाठी बेहिशेबी रक्कम मोजावी लागते, शिवाय कालापव्यय होतो हे वेगळेच, अशा उद्योजकांना मदत करणे.

(ब) नवीन खाण प्रकल्पांचा शोध घेणे, त्यांना इतर संबंधीत विभागांकडून आवश्यक ती मान्यता मिळवून देणे.

(क) खनिज उद्योजकांसाठी, खाणीतील कामे सुरळीत होण्यासाठी आवश्यक ते रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शैक्षणिक प्रशिक्षणाच्या सुविधा व पडीक मालाची ने-आण करणे इत्यादी सुविधा सध्या संबंधित खाणकाम उद्योजकांकडून करण्यात येतात. तथापि, त्या अत्यल्प प्रमाणात व अत्यावश्यक तेवढ्याच असल्यामुळे व खर्चाचा अधिक भार पडतो म्हणून पुरेशा सोयी उपलब्ध करण्यास उद्योजक अनुच्छुक असतात. हे टाळण्यासाठी या सर्व व्यवस्था करून देणे तसेच, यावरील सर्व खर्च **खनिज विकास निधीतून** भागविण्यात येईल. यासाठी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म यांच्याकडून आवश्यकतेप्रमाणे महामंडळाला निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(ड) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ बंद करण्याचा शासन निर्णय रद्द करून पुनर्जिवित व सुदृढ करावे.

(२) **खनिजनिहाय धोरण (मिनरलवाईज पॉलिसी)**

(१) **कोळसा (कोल)**.—महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाकडून कोळशाचे ब्लॉक मिळवून कोळसा खाण क्षेत्रात प्रवेश करण्याचे योजिले आहे. हे कोळशाचे ब्लॉक महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ या कवच यंत्रणेमार्फत खाजगी उद्योजकांना हस्तांतरित करण्यात येतील. त्यामुळे सद्या अस्तित्वात असलेल्या व पुढे निर्माण होणाऱ्या उर्जा निर्मिती प्रकल्पांना या कोळशाचा मोठ्या प्रमाणात पुरवठा होणार असल्याने **वेस्टर्न कोल फिल्ड लि.** या कोळसा खाणीवर, सध्या अवलंबून राहावे लागते तसे यापुढे लागणार नाही. या कोळश्याच्या ब्लॉकचे वाटप, यासाठी स्थापन होणाऱ्या **राज्यस्तरीय समिती** कडून खाजगी उद्योजकांना करण्यात यावयाचे आहे. तसेच राज्यामध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कोळसा स्वच्छ करण्याची **कोल वॉशरी युनिटची** देखील स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे आणि अशाप्रकारे स्वच्छ केलेला कोळसा नजीकच्या भविष्यकाळामध्ये उर्जा निर्मितीच्या प्रकल्पाकडून वापरण्यात यावयाचा आहे.

(२) **चुनखडक (लाईमस्टोन)**.—सद्या राज्यामध्ये ३ सिमेंट प्लॅन्ट कार्यरत आहेत. त्यामध्ये वाढ करून आणखी २ ते ३ सिमेंट प्लॅन्ट उभारण्याचे प्रस्तावित आहे. याच्याकरिता **कवच यंत्रणा (शेल एजन्सी)** चुनखडीच्या क्षेत्राबाबत केंद्र शासनाकडून आवश्यक ती मंजूरी घेऊन सर्व तयार प्रकल्प चुनखडीच्या क्षेत्रासह खाजगी उद्योजकांना देईल.

(३) **लोह खनिज (आयर्न ओर)**.—गडचिरोली जिल्ह्यातील सूरजगड क्षेत्रामध्ये मोठा लोह खनिजावर आधारित पिग-आयर्न प्रकल्प उभारण्याची राज्य शासनाची महत्त्वाकांक्षा आहे. लोह खनिज क्षेत्राकरितासुद्धा केंद्र शासनाकडून आवश्यक ती मंजूरी मिळविणे, प्रकल्प सुरू करण्याकरिता सर्वतोपरी मदत करणे याकरिता या क्षेत्रातील **कवच यंत्रणा** खाजगी उद्योजकांना मदत करील.

(४) **मँगनीज (मँगनीज)**.—मँगनीजयुक्त क्षेत्र खाजगी उद्योजकांना उपलब्ध करून देणे हे राज्य शासनाचे धोरण राहील. **मॉईल** कडून अशी क्षेत्रे अभ्यर्पित केल्यानंतर ती खाजगी उद्योजकांसाठी खुली करण्यात येतील. त्यामुळे सार्वजनिक उपक्रम व खाजगी उद्योजक यांमध्ये उत्पादनाच्या दृष्टीने मोठी स्पर्धा वाढीस लागेल.

(५) **अप्रभावी खनिजे (रिफ्रॅक्टरी मिनरल्स)**.—भंडारा जिल्ह्यामध्ये रिफ्रॅक्टरी ब्रिक्सचे उत्पादन करण्याकरिता जे उद्योजक पुढे येतील अशा खाजगी उद्योजकांना, ५ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांकडून आणि त्यापेक्षा अधिक क्षेत्र असल्यास **कवच यंत्रणे** कडून आवश्यक ती मदत देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

(६) **बॉक्साईट (बॉक्साईट)**.—कोल्हापूर, सातारा, रायगड व रत्नागिरी येथील खुले करण्यात आलेले बॉक्साईटचे क्षेत्र, नवीन खनिपट्टाधारकांना मंजूर करण्यात येत आहे. बॉक्साईटचा वापर कॅलसाईन्ड अल्युमिना प्लॅन्टस् मध्ये केला जातो. अशाप्रकारचे प्रकल्प राबविणाऱ्या उद्योजकांना सर्वप्रकारची मदत करण्याची राज्य शासनाची तयारी आहे.

(७) **इतर महत्त्वाची खनिजे (अदर इंपॉर्टन्ट मिनरल्स)**.—बेस मेटल्स, सोने, टंगस्टन इत्यादी, या खनिजाच्या पूर्वेक्षणासाठी आणि समन्वेषणासाठी विदेशी गुंतवणूकदारांना प्रोत्साहित करण्याचे राज्य शासनाने योजिले आहे. अशा उद्योजकांना केंद्र शासनाकडून वाजवी दराने, आवश्यक ती माहिती मिळवून देण्यास राज्य शासन मदत करील.

(८) **ग्रेनाईट (ग्रेनाईट)**.—याचा उपयोग मुख्यत्वे **पॉलीश** करिता केला जातो. महाराष्ट्रामध्ये ग्रेनाईटचे साठे विशेषतः सिंधुदुर्ग, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, नांदेड व ठाणे येथे आढळून आलेले आहेत. घरगुती आवश्यकतेनुसार हे खनिज फार गरजेचे आहे, हे विचारात घेऊन याबाबतचे **स्वतंत्र धोरण** ठरविण्यात येईल.

(९) **इमारत सामुग्री (बिल्डींग मटेरियल)**.—यामध्ये विशेषतः गिट्टी, विटा, वाळू व मुरूम यांचा समावेश होतो. बांधकामासाठी याचा सर्रास वापर केला जातो. ही गौण खनिजे आहेत. याबाबत जिल्हास्तरावर सुरक्षित दगड खाणीचे क्षेत्र घोषित करण्यासंबंधी व प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी या खात्यामार्फत योग्य ते धोरण ठरविण्यात येईल.

बांधकाम क्षेत्रातील विटांचे उत्पादन करणाऱ्या लहान उद्योजकाना परवाना तत्त्वावर सर्व प्रकारचे प्रोत्साहन देण्यात यावयाचे आहे. तथापि, नद्यांच्या पात्रामधून प्राप्त होणाऱ्या **वाळू** ला फार मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. तथापि, नद्यांच्या पात्रामध्ये वाळूची कमतरता जाणवत असल्याने वाळूचे मोठ्या प्रमाणात संशोधन करून वाळूचे किंवा इतर खडक यांच्यापासून पर्यायी **वाळू** तयार करता येईल का व ती नदीतील वाळूपेक्षा व्यवहारात स्वस्त पडेल काय, याबाबतही संशोधन करण्यात येत आहे.

**खाण क्षेत्राचा विकास (खनिज विकास निधीची निर्मिती)**

(क) (१) **खनिज विकास निधीची निर्मिती (क्रियेशन ऑफ मिनरल डेव्हलपमेंट फंड)**.—समन्वेषण आणि खनिज विकास (मिनरल डेव्हलपमेंट) ही दोन उद्दिष्टे साधण्यासाठी या खनिज विकास निधीची खालील बाबींकरिता आवश्यकता आहे—

(अ) समन्वेषण आणि तपासणी करण्यासाठी आधुनिक यंत्र सामुग्रीची जमवाजमव.

(ब) खाजगी उद्योजकांच्या उपयोगासाठी निवडलेले क्षेत्र त्यांना लाभधारक आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल आणि संगणकीय डेटा तयार करणे.

(क) खनिज वसाहती निर्माण करणे व खाण क्षेत्रामध्ये मुलभूत सुविधांची उपलब्धता करून देणे.

(ड) वनरोपण करणे.

(इ) मागास समाजाकरिता कल्याणकारी योजना राबविणे.

वरील सर्व बाबींच्या पूर्ततेसाठी येणाऱ्या खर्चाच्या रकमेची उपलब्धता, दर वर्षी प्राप्त होणाऱ्या राज्याच्या एकूण **खनिज महसूलाच्या** १० टक्के इतकी रक्कम **खनिज विकास निधीकरिता** वळती करण्यात येईल. यासाठी महाराष्ट्र खनिज विकास निधी (निर्मिती व वापर) अधिनियम २००१ तयार करण्यात आला आहे.

(२) **मूलभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चरल फॅसिलिटीज).**—खाण क्षेत्रामध्ये ज़ाण्या-येण्यासाठी रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, शाळा इत्यादी मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत राज्य शासनातर्फे खास प्रयत्न करण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी रस्ते व पाणी पुरवठा या बाबींसाठी येणाऱ्या खर्चाच्या एकूण रकमेपैकी ५० टक्के रक्कम संबंधित उद्योजकांकडून घेण्यात येऊन उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाच्या **खनिज विकास निधीतून** खर्च करण्यात येईल. जर शासनाच्या **खनिज विकास निधीमध्ये** पुरेशी रक्कम उपलब्ध नसेल तर या दोन बाबींसाठी येणारा संपूर्ण खर्च प्रथमतः संबंधित उद्योजकाकडून करण्यात येईल व त्याची ५० टक्के प्रतिपूर्ती स्वामित्वधनाच्या (रॉयल्टी) देय रकमेतून वळती करून घेण्यात येईल. वैद्यकीय सुविधांची, शाळांची व्यवस्था करण्यासंबंधात संबंधीत प्रशासनीक विभागांना आवश्यक ते निर्देश देण्यात येतील. यामुळे खाण क्षेत्रातील आरोग्य सुधारण्यास व निरक्षरतेचे उच्चाटन होण्यास मदत होईल.

(३) **खाण संपत्तीचा विकास (डेव्हलपमेंट ऑफ मायनिंग प्रापर्टीज)**

(१) **प्रमुख खनिजे.**—सद्या खनिजावर आधारित अस्तित्वात असलेल्या उद्योगामध्ये अधिक भर घालण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. खनिजावर आधारित उद्योगांकडे खास लक्ष देण्यात आले असून **महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ या कवच यंत्रणेला** कमीत कमी वेळात तयार प्रकल्प अहवाल (रेडिमेड प्रोजेक्टस् रिपोर्टस्) तयार करण्याबाबत निर्देश देण्यात येतील व हे अहवाल जास्तीत जास्त पारदर्शक असल्याची खात्री करून खाजगी उद्योजकाना उपलब्ध करून देण्यात येतील.

(२) **गौण खनिजे**—राज्यातील मोठ्या शहरांमध्ये जेथे मोठ्या प्रमाणात रचनात्मक/विकासात्मक कार्य होत आहे, अशा शहरांजवळील दगडखाण क्षेत्राचा शोध घेण्यात येईल. अशी क्षेत्रे समूह स्वरुपात मंजूर केली तर कामगारांना कल्याणकारी सुविधा पुरविणे शासनास सुलभ होईल. तसेच, यामुळे उद्योजकांना खाणीचे लहान समूह सुरू करण्याची संधी व स्थानिक लोकांना अधिक रोजगाराच्या सुविधा उपलब्ध होतील.

(३) **खाणकामाला औद्योगिक दर्जा देणे**––राज्यातील खाणकामाला औद्योगिक दर्जा प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे सोयी सवलती उपलब्ध होण्यास मदत होईल.

(४) **भूसंपादन (लँड ॲक्वीझीशन)**––महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ ही स्वायत्त संस्था असून राज्यातील सर्व उद्योग प्रकल्पांना पायाभूत सुविधा आणि आवश्यक तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देण्यास व विकसित करण्यास मदत करित असल्याने खाणकाम प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही या संस्थेमार्फत करणे शक्य आहे.

(१) **सामुहिक प्रोत्साहन योजना (पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव्हज)**––राज्यातील विविध विकसीत व विकसनशील विभागामध्ये विखुरलेल्या उद्योगांचे एकत्रिकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे सामुहिक प्रोत्साहन शासनातर्फे देण्यात येत आहे––

(अ) विक्रीकर प्रोत्साहन

(ब) जकात किंवा प्रवेश कराचा परतावा

(क) प्रकल्पाची शक्याशक्यता अजमावण्यासाठी/अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरिता वित्तीय सहाय्य.

(ड) लघु उद्योगांना विशेष भांडवल प्रोत्साहन

(इ) विद्युत शुल्काचा परतावा

(२) **मुद्रांक शुल्कामध्ये सूट**––व्यवहाराच्या लेखा/दस्तऐवजावर पुरावा म्हणून मुद्रांक शुल्क आकारण्यात येते. साधारणपणे निष्पादित होणाऱ्या दस्तऐवजाच्या प्रकारावर मुद्रांक शुल्काची रक्कम अवलंबून असते. राज्य शासनाने निरनिराळ्या प्रकारच्या दस्तऐवजावर मुद्रांक शुल्क आकारण्याबाबतच्या रचनेचे सुसुत्रिकरण करण्याचे काम सुरू केले आहे. वित्त पुरवठ्याबाबत सुलभ पद्धतीचा आरंभ म्हणून भाडेपट्ट्याबाबत मुद्रांक शुल्काची रचना एकप्रवाही करणे आवश्यक आहे. सध्या राज्यामध्ये, पट्ट्याच्या स्वाक्षरीत करारावर मुद्रांक शुल्काचा दर हा सरासरी वार्षिक भाडेपट्ट्याच्या तीन टक्के इतका आहे.

(३) **माहितीचे प्रसारण (इन्फॉरमेशन डिससेमीनेशन)**

(अ) **सर्वसाधारण (जनरल)**––

(१) निरनिराळ्या खनिजाच्या समन्वेषणासंबंधीच्या विविध योजनांबाबतची सद्यःस्थिती दर्शविणारी माहिती योग्य त्या माध्यमातून वेळोवेळी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांनी लोकहितास्तव विशेषतः खाणकाम क्षेत्रातील संबंधीतांकरिता प्रसारित करावयाची आहे. यामुळे खनिजाचे महत्त्व तसेच त्याच्या वापरासंबंधी लोकजागृती वाढीस लागेल.

(ब) **तांत्रिक (टेक्निकल)**.––भावी खनिपट्टे धारकांना राज्य शासनाकडून हेतूपत्रे प्राप्त झाल्यानंतर व त्यांनी पत्राद्वारे विनंती केल्यास व ती राज्य शासनाने मान्य केल्यास खनिजाच्या संबंधातील आवश्यक ती तांत्रिक माहिती शासनाकडून त्यांना त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाच्या सध्याच्या ४०% ऐवजी २५% एवढी रक्कम आकारण्यात यावी, असे प्रस्तावित आहे.

(४) **भू बँक (लँड बँक)**––राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये वन पुनर्वसनासाठी एकत्रित जागा उपलब्ध करून देण्यासाठी भू बँकांची निर्मिती करण्यात आली आहे. सध्या पाटबंधारे प्रकल्पांसाठी विशेष करून ही सुविधा वापरात आहे. हीच सुविधा खाण प्रकल्पांसाठी सुद्धा वापरण्यात यावी असे प्रस्तावित आहे. यासाठी येणाऱ्या खर्चाच्या जास्तीत जास्त ५०% पर्यंतची रक्कम **खनिज विकास निधी** मधून शासनाच्या मान्यतेनंतर देण्यात येईल.

(ड) **कार्यपद्धतीचे सुलभीकरण (सिम्प्लीफिकेशन ऑफ द प्रोसिजर्स)**––

(१) **खनिज सवलतीबाबत तात्काळ मंजूरी (एक्सपेडीशस् ग्रांट ऑफ मिनरल कन्सेशन्स)**.––राज्यात उपलब्ध होणाऱ्या, अधिसूचित असलेल्या व अधिसूचित नसलेल्या खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती आणि खनिपट्टे व त्यांचे नुतनीकरण यासाठी मंजूरी द्यावी लागते. खनिजे ही राज्याची संपत्ती असल्यामुळे खनिज-युक्त क्षेत्राबाबतची आवश्यक ती माहिती महसूल प्राधिकरणाने प्रमाणीत करणे आवश्यक आहे. सध्या प्रचलित असलेली, महसूल अहवाल सादर करण्याची कार्यपद्धती सुलभ करून त्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे. ही कालमर्यादा जिल्हाधिकारी, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय व शासन स्तरावर कटाक्षाने पाळली जाईल की, ज्यायोगे खनिज सवलतीचे अर्ज अंतिमतः कमीत कमी वेळात निकाली काढण्यात येतील––

(अ) गौण खनिजाच्या अर्जासाठी ६० दिवस (पूर्वी मर्यादा ठरविलेली नव्हती).

(ब) अधिसूचित नसलेल्या प्रमुख खनिजाबाबतीतील अर्जासाठी १६ ते २० आठवडे. (पूर्वीची मर्यादा २४ आठवड्याची आहे.)

(क) अधिसूचित असलेल्या प्रमुख खनिजाबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे शिफारस करण्यापर्यंत २० आठवडे (पूर्वीची मर्यादा २४ आठवड्यांची आहे.)

(२) **गौण खनिजे**––ज्या शहराभोवती मोठ्या प्रमाणावर बांधकामाची आणि विकासाची कामे सुरू आहेत अशा मोठ्या शहराजवळ गौण खनिज उत्खननाकरिता खाणकाम क्षेत्रे निश्चित करण्यात येणार आहेत. या व्यवस्थेमुळे एकाच ठिकाणी खाणी समूह निर्माण होऊन शासनाला अशा खाणीतील मजूरांकरिता कल्याण योजना लागू करणे सोईचे होणार आहे.

(३) **पर्यावरणाची मंजूरी (एन्व्हायरमेंटल क्लिअरंस)**——राज्यामध्ये कोणत्याही गौण अथवा प्रमुख खनिजांच्या खाण कामाच्या कार्यवाहीस सुरुवात करताना संबंधित प्राधिकरणाकडून योग्य ती पर्यावरण मंजूरी घेणे आवश्यक आहे. वन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात खाण प्रकल्प सुरू करावयाचा असेल तर त्यासाठी वन विभागाची मंजूरी तसेच, पर्यावरण मंजूरी **एम. ओ. ई. एफ.** या केंद्र शासनाच्या विभागाकडून घेणे अत्यावश्यक आहे. सध्या **इंडियन ब्युरो ऑफ माईन्स** कडे (केंद्र शासनाचा उपक्रम) सादर करण्यात येणाऱ्या खाणकाम नकाशामध्ये सर्व प्रकारच्या पर्यावरणाशी संबंधीत असलेल्या बाबींची तपासणी करण्यात येते. याच पद्धतीने **एम. ओ. ई. एफ.** कडून देखील तपासणी करण्यात येत असल्याने सदर तपासणी केंद्र शासनाच्या दोन प्राधिकरणांकडून वेगवेगळी होते. म्हणून राज्य शासनाने असे ठरविले आहे की, ही बाब **एम. ओ. ई. एफ.** या केंद्र शासनाच्या विभागाच्या निदर्शनास आणून केंद्र शासनाच्या केवळ **इंडियन ब्युरो ऑफ माईन्स** हेच प्राधिकरण वन क्षेत्राचे प्रयोजन जर बदलावयाचे नसेल तर, इतर सर्व बाबतीत अधिकृत राहील.

(४) **पर्यावरणाचे संरक्षण (एन्व्हायरमेंटल प्रोटेक्शन)**.——सध्या खाणक्षेत्रामध्ये पर्यावरणाचे संरक्षण ही संबंधीत खनिपट्टाधारकाची जबाबदारी आहे. याबाबतीतील नियम व विनियमासंबंधी कडक अंमलबजावणी करण्याचे शासनाने योजिले आहे. इतकेच नव्हे तर, विक्रीकर अधिनियम, १९६१ अन्वये ज्या वित्तीय सवलती देण्यात येतात, त्याखेरीज ज्यांच्याकडून पर्यावरणाच्या संरक्षणाच्या उपाययोजना आधुनिक पद्धतीने केल्या जातील अशांना राज्य शासनातर्फे सवलती देण्यात येतील.

(इ) **रोजगाराच्या संधी (एम्प्लॉयमेंट अपॉरच्युनिटीज)**——जेव्हा नवीन खाण प्रकल्प उदयास येतो, त्याबरोबर निरनिराळ्या प्रकारच्या तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाच्या रोजगाराच्या संधी आपोआपच उपलब्ध होतात. याबाबतीत दुर्बल घटकातील स्थानिक लोकांना व विविध मागासवर्गीय समुहातील व्यक्तींना प्राधान्य देण्याचे शासनाने योजिले आहे. मोठ्या खाण प्रकल्पामुळे पुरक उद्योगधंदे निर्माण होऊन जादा रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होईल. त्याचप्रमाणे, स्थानिक रहिवाशाना स्वयंरोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतील. तसेच, इच्छुक व्यक्तींना निरनिराळ्या तांत्रिक क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या योग्य त्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीत उद्योजकांना निर्देश देण्याचे शासनाने योजिले आहे.

राज्यामध्ये खनिजापासून दरवर्षी प्रमुख व गौण खनिजापोटी सरासरी रुपये २५० कोटी इतका खनिज महसूल जमा होतो. राज्यात अवैध खनिज उत्खनन व वाहतुकीची प्रकरणे वरचेवर निदर्शनास येतात. यावरुन पुर्णांशाने खनिज महसुलाची वसुली होत नाही, हे दिसून येते. त्यामुळे राज्यामध्ये सर्वसाधारणपणे वसूल होणाऱ्या खनिज महसूलाच्या २०% म्हणजेच अंदाजे रुपये ५० कोटी खनिज महसुलाचे नुकसान होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.